**आजचा शुभ विचार**

स्वप्ने पाहणाऱ्यांना अडथळे आव्हानांचे संकेत म्हणून दिसतात, निराशेचे नाही. स्वप्नांच्या पीछ्याने जाताना, तुमच्या मनाची शक्ती वाढते.


RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!






मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-69 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thursday 17 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६९ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. १७ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## विधानसभेत गाजला हनीट्रॅपचा मुद्दा, नाना पटोलेंनी सभागृहात दाखवला पेनड्राईव्ह

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

राज्याच्या पावसाळी अधिवेशनाचा शेवटचा आठवडा सुरू आहे. विधानसभेत गुरुवारी हनीट्रॅपचा मुद्दा उपस्थित झाला. काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी हा मुद्दा उपस्थित केला. 'मुंबईत मंत्रालय, तसेच नाशिक आणि ठाणे जिल्हा ही हनीट्रॅपची केंद्र झाली आहेत. राज्यातील किमान ७२ महत्त्वाच्या व्यक्ती हनीट्रॅपला बळी पडल्या आहेत. राज्याशी संबंधित महत्त्वाची माहिती हनीट्रॅपमुळे आता चुकीच्या लोकांच्या हाती पडली आहे. महाराष्ट्राची बदनामी होत आहे. या बाबत महाराष्ट्र शासनाचे मंत्री काही उत्तरही दे नाहीत' असा गंभीर आरोप नाना पटोले यांनी केला.

हनीट्रॅपमुळे राज्यातील गोपनीय शासकीय कागदपत्रे आणि माहिती चुकीच्या लोकांच्या हाती पडली आहे. गोपनीय माहिती राज्याबाहेर गेली आहे. काही आयएसएस अधिकारी, मंत्री हे पण हनीट्रॅपला बळी पडल्याचा आरोप करत



नाना पटोले यांनी सभागृहात एक पेनड्राईव्ह दाखवला. पेनड्राईव्ह दाखवून कोणाचे चरित्रहनन करायचे नाही. पण एवढ्या गंभीर प्रश्नावर सरकार साधे निवेदनही करत नाहीत. या राज्यात नेमके काय सुरु आहे ? असा प्रश्न नाना पटोलेंनी उपस्थित केला.

नानांच्या वक्तव्यावर राज्य शासनाने पावसाळी अधिवेशन संपण्याआधी निवेदन द्यावे, असे निर्देश विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले. तर विधानसभाध्यक्षांच्या आदेशाचे पालन होईल असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. राज्य शासनाने आरोप गांभीर्याने घेतले आहेत, असेही ते म्हणाले.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आश्वासन दिल्यानंतरही शिउबाठाचे आमदार भास्कर जाधव उभे राहिले आणि म्हणाले, " गुरुवारी राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी माध्यमांसमोर जाहीर विधान केले आहे की, नाशिकच्या आणि ठाण्याच्या माणसानेसुद्धा दिलेली तक्रार मागे घेतली. सेटलमेंट करून प्रकरण मिटवले आहे. तर आता उपमुख्यमंत्री म्हणतात की, आम्ही हे प्रकरण गांभीर्याने घेऊ. हे सरकार सभागृहाचे आणि राज्याच्या जनतेची दिशाभूल करत आहे का?" असा गंभीर आरोप केला. यावर स्पष्टीकरण देताना गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी स्पष्टीकरण दिले की, "मी ज्या प्रकरणाची माहिति दिली ते वेगळे प्रकरण आहे. ती तक्रार हनीट्रॅपची नव्हती." यावरून विरोधकांनी गोंधळ घातला. भास्कर जाधव यांनी आमच्याकडे नावे असल्याचा दावा केला. त्यानंतर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांविरोधात घोषणाबाजी केली.

## 'अरे त्या डिनो मोरियानं तोंड उघडलं तर'..; सभागृहात उपमुख्यमंत्री शिंदेंचा जबरदस्त इशारा

### टेंडर टेंडर करून मुंबईला विकणारा वेंडर कोण? : उपमुख्यमंत्री शिंदे

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------------



पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सभागृहात खडाजंगी पाहायला मिळत आहे. अशातच मिठी नदीतला गाळ काढण्याचा कंत्राट देताना मराठी माणूस दिसला नाही का, असा सवाल करत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे विधानसभेत विरोधकांवर भडकले. आता त्या डिनो मोरियाने तोंड उघडलं तर कितीतरी लोकांचा मोरया होईल, असा मोठा इशारा त्यांनी दिला. विरोधकांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर त्यांनी उत्तर दिलं. "काँक्रीटचे रस्ते केल्यानंतर त्यात २५ वर्षे दुरुस्ती करावी लागत नाही. मग दरवर्षी दुरुस्ती करून, काळ्याचं पांढरं करून, त्यामध्ये दुरुस्तीची कामं काढून पैसे लुबाडण्याचं काम कोण करत होतं? आम्ही तर डीप क्लीन ड्राइव्हने रस्ते धुवायला गेलो, तुमच्या लोकांनी तर तिजोऱ्या धुतल्या," अशी घणाघाती टीका त्यांनी विरोधकांवर केली.

गेल्या काही महिन्यांपासून मिठी नदीचा गाळ काढण्याच्या प्रकल्पातील अनियमितता आणि निधीच्या गैरवापराचं प्रकरण चर्चेत आहे. याप्रकरणात बॉलिवूड अभिनेता डिनो मोरियाचं नाव समोर आलं आहे. त्याची ईडीकडून चौकशी सुरू आहे. यावरून विरोधकांना निशाणा साधत शिंदे पुढे म्हणाले, "बोलायला आम्हाला पण येतं. मिठी नदीतला गाळ कोण काढतोय? कोण आहे कॉन्ट्रॅक्टर? यांना डिनो मोरिया दिसला, मराठी माणूस नाही दिसला का? आता त्या मोरियाने तोंडं उघडलं तर कितीतरी लोकांचा मोरया होईल. आरोप करताना असे करा..

'जो खुद शिशे के घर मे रहते है, वो दुसरों पर पत्थर नहीं फेका करते'. जेव्हा तुम्ही भ्रष्टाचाराचा आरोप करता, तेव्हा तुम्हाला आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. टेंडर टेंडर करून मुंबईला विकणारा वेंडर कोण, ते पण सांगा. सगळी यादी काढा, मग मराठी माणसाबद्दल बोला."

गेल्या २० वर्षांपासून मुंबईतील मिठी नदीतील गाळ काढण्यासाठी प्रकल्प सुरू आहे. त्यासाठी ११०० कोटी रुपयांचं कंत्राट देण्यात आलं होतं. एकूण १८ कंत्राटदारांना हे कंत्राट देण्यात आल्याचं प्राथमिक चौकशीत निष्पन्न झालं. त्यापैकी अनेकांची चौकशीसुद्धा करण्यात आली होती. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींनी पालिकेचे ६५ कोटी ५४ लाख रुपयांचं नुकसान केल्याचा आरोप आहे. याप्रकरणात आता ईडीनेही उडी घेतली आहे. कथित गैरव्यवहारसंबंधी आर्थिक व्यवहारांची पडताळणी सुरू असून त्यासाठी हे छापे टाकण्यात आल्याचं कळतंय. याप्रकरणी डिनो मोरिया आणि त्याचा भाऊ सॅन्टिनो या दोघांची ईडीकडून चौकशी सुरू आहे.

## भाडे वाढवून मिळण्यासाठी उबर, ओला चालकांचा संप, प्रवाशांचे हाल

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

मुंबईमध्ये गेल्या दोन दिवसांपासून ओला उबेर चालकांचा संप सुरू आहे. ॲप कंपन्यांकडून शासनाने ठरवून दिल्याप्रमाणे प्रतिकिमी भाडे वाढवून मिळावे, अशी या चालकांची मागणी आहे. तसेच रिक्षा आणि टॅक्सीप्रमाणे आमचे दरही निश्चित करावेत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.त्यासाठी मंगळवार (दि.१५) पासून आझाद मैदानात ओला उबर टॅक्सी चालकांचे आंदोलन सुरु आहे.या संपाचा फटका सर्वसामान्य मुंबईकरांना बसत आहे.

ओला, उबर, रॅपिडोने आकारलेले मनमानी दर बंद करावेत. त्या ऐवजी सरकारी मीटर दर करावेत अशी मागणी या चालकांची आहे. शिवाय बाईक टॅक्सी कोणत्याही स्वरूपात मुंबई असू नये अशी त्यांची मागणी आहे.रिक्षा व कॅब परमिट वर मर्यादा आणली




जावी. रिक्षा टॅक्सी कल्याणकारी मंडळ कार्यान्वित केले जावे. महाराष्ट्र गिग वर्कर्स ॲक्ट लागू करण्याचीही मागणी या संपाच्या माध्यमातून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर आझाद मैदानात ओला, उबर आणि रॅपिडो कंपनीच्या शेकडो चालकांनी मंगळवार(दि.१५) पासून संप सुरू केला आहे. आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी आंदोलक आक्रमक झाल्याचे चित्र आहे.

या आंदोलनातील एक मुख्य मुद्दा म्हणजे ओला, उबर, रॅपिडो यांसारख्या ॲप-आधारित परिवहन कंपन्यांचे नियमन करण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारावी, ही मागणी आहे. परिवहन विभागाच्या अलीकडील एका पत्रानुसार, या कंपन्या निलंबनाच्या आदेशांनंतरही बेकायदेशीररीत्या दुचाकी टॅक्सी आणि बस चालवित आहेत. परिवहन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, रॅपिडोची दुचाकी टॅक्सी सेवा थांबवण्यात आली आहे, मात्र ॲपवरील हालचाली आणि स्क्रीनशॉट दर्शवतात की ही सेवा अजूनही सुरू आहे.

आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, वारंवार नियमभंग करूनही या ॲप प्लॅटफॉर्म्सना कोणतीही शिक्षा होत नाही, मग ती सर्ज प्रायसिंग (दरवाढ), कामगारांचे शो षण किंवा भारतीय परिवहन नियमांचे उल्लंघन असो. आंदोलनकर्त्यांनी यावेळी केंद्रीय परिवहन मंत्रालयावरही टीका केली आहे की, त्यांनी ॲप प्लॅटफॉर्मना दुहेरी भाडे आकारण्यास परवानगी दिली आहे. हे धोरण बेकायदेशीर सेवा पुरवणाऱ्यांना संरक्षण देणारे आहे आणि प्रवासी व चालक दोघांच्या हिताकडे दुर्लक्ष करणारे आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.


## महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449


## पंढरपूरातील २१३ सफाई कामगारांना ६०० चौरस फुटांची घरे मिळणार :- उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

राजेश यादव
सोलापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------------

सुधारित पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये पंढरपूर शहरातील सफाई कामगारांसाठी सदनिका बांधकामांचा समावेश आहे.या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह काही लोकप्रतिनिधींकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार पंढरपूर शहरातील २१३ सफाई कामगारांना प्रत्येकी ६०० चौरस फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येतील. त्यासाठी ५५ कोटी ६१ लाख रुपयांचा खर्च प्रस्तावित आहे, अशी माहिती उपमुख्यमं



त्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य हेमंत रासने यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना ते बोलत होते. पंढरपूर शहरातील सफाई कामगारांना घरे देण्याच्या प्रकल्पामध्ये एकूण १३ इमारती आणि २१३ रहिवासी युनिट आहेत. या १३ इमारतींपैकी १२ इमारती ४ मजली असून, एक इमारत ५ मजली आहे. त्यामध्ये रस्त्यालगत असलेल्या ७ इमारतींमध्ये २४ दुकानांचे गाळे आहेत. या सफाई कामगारांना लवकरात लवकर घरे देण्याच्या दृष्टीने आजच स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सोलापूर जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात येईल आणि त्यांना योग्य ते निर्देश देण्यात येतील. या सफाई कामगारांच्या प्रलंबित घरांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यात येईल आणि त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

संपादकीय

# शुभांशू शुक्ला सुखरूप पृथ्वीवर परतले

ॲक्सिअम - ४' मोहिमेतलं अंतराळवीरांना परत पृथ्वीवर घेऊन येणारं 'ग्रेस यान' मंगळवारी दुपारी तीन वाजून एक मिनिटांनी प्रशांत महासागरातल्या अमेरिकेच्या सेंट दियागो किनाऱ्यालगत पाण्यात अलगद उतरलं, तेव्हा भारताने आपल्या अंतराळ विज्ञानाच्या प्रगतीतला खूप महत्त्वाचा टप्पा पार केला. 'ॲक्सिअम-४' अंतराळ मोहिमेत सहभागी झालेल्या ४ अंतराळवीरांपैकी केवळ एक, शुभांशू शुक्ला भारतीय असला, तरी भारताच्या आगामी 'गगनयान' या अत्यंत महत्त्वाकांक्षी, स्वदेशी मोहिमेची मुहूर्तमेढ शुभांशूच्या या यशस्वी अंतराळफेरीने रोवली, हे महत्त्वाचं आहे.

शुभांशूआधी भारताचा राकेश शर्मा हा अंतराळवीरही अंतराळात जाऊन सुखरूप परतला आहे. पण, त्याचा अंतराळ काळ कमी दिवसांचा होता आणि ती मोहीम मुख्यतः रशियाचीच होती. रशियाच्या 'सॅल्यूट - ७' या अंतराळ तळावर आठ दिवस राहून राकेश शर्मा परत आला, त्याला चाळीस वर्षे झाली. राकेश शर्माचा आदर्श समोर ठेवून सुधांशू शुक्ला अंतराळात गेला. आंतरराष्ट्रीय अवकाश संशोधन केंद्रात पाऊल ठेवणारा तो पहिला भारतीय ठरला. पृथ्वीच्या कक्षेबाहेर २० दिवस राहून सुखरूप परतणाराही तोच पहिला भारतीय ठरला. भारताच्यादृष्टीने अनेक महत्त्वाचे प्रयोग त्याने केले. त्या प्रयोगांनी संबंधित क्षेत्रात नवी दिशा सापडेल आणि समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी त्यातून जी रहस्य उघडतील, त्याचं प्राथमिक श्रेयही सुधांशूलाच द्यावं लागेल! शुभांशूचं सुरू असलेलं कौतुक, त्यासाठी त्याने घेतलेले कष्ट, जिद्द आपल्या उगवत्या पिढीपुढे ठेवली, तर त्यातून आणखी अनेक अंतराळवीर तयार होतील आणि ते भारताचे नाव अवघ्या विश्वात उंचावतील, यात शंका नाही.

'ॲक्सिअम - ४' ही मोहीम खरंतर गेल्या वर्षीच्या सुरुवातीलाच फत्ते व्हायची होती. पण, वातावरणाच्या अनेक अडचणी येत गेल्या. नवी तारीख जाहीर व्हायची, संपूर्ण तयारी केली जायची; पण हवामान आणि पृथ्वीच्या कक्षेच्या सीमारेषेवरील वातावरण दरवेळी काहीतरी नवी अडचण उभी करत असे. अखेरीस २६ जूनचा मुहूर्त कामी आला. त्या दिवशी अंतराळवीरांना घेऊन जाणाऱ्या यानासह अग्निबाणाने पृथ्वीची कक्षा ओलांडली. यानाने आपल्या १८ दिवसांच्या अंतराळ मुक्कामात पृथ्वीभोवती तब्बल २८८ प्रदक्षिणा घातल्या, ७६ लाख मैलांचा प्रवास केला. ४३३ तासांच्या या अथक प्रवासादरम्यान सर्व शास्त्रज्ञांनी मिळून एकूण ६० संशोधनपर प्रयोग केले. शुभांशूने केलेल्या प्रयोगांमुळे भारतातल्या स्टेम सेलसंबंधातील संशोधनाला गती मिळेल, असा शास्त्रज्ञांचा विश्वास आहे. भारत आज अंतराळ संशोधनात अग्रेसर नाही, हे खरं. पण, त्या यादीत पहिल्या पाचांत आहे, हेही खरं. या क्षेत्रातील अतिप्रगत देशांच्या पंक्तीत मानाचं स्थान मिळवण्यासाठी भारताला अजून वेळ आहे. नियोजित 'गगनयान योजने'ने या क्षेत्रात आणखी काही पावलं पडतील, असं मानायला मात्र जागा आहे. 'ॲक्सिअम- ४' योजनेतला शुभांशूचा सहभाग, 'नासा'च्या अमेरिकेतल्या संशोधन केंद्रात तब्बल आठ महिने शिकण्याची मिळालेली संधी, अंतराळ प्रवासाचा आणि रहिवासाचा अनुभव - हे सगळंच 'गगनयान' साठी पायाभरणी ठरणार आहे. ही पायाभरणी अगदी भक्कम झाली, असं 'इस्रो'तील तज्ज्ञांचं मत झालं आहे. ॲक्सिअम-४' मधील तीच भारताची मोठी कमाई आहे.

'गगनयान योजने'साठी संपूर्ण भारतीय बनावटीच्या एचएलव्हीएम-३ या अग्निबाणाची उभारणी जवळजवळ पूर्ण झाली आहे. गगनयान अंतराळ यानाची उभारणीही अंतिम टप्प्यात आहे. या मोहिमेसाठी ज्यांची निवड झाली आहे, त्या प्रशांत नायक, अजित कृष्णन् आणि अंगद प्रताप यांना भारत आणि रशियाच्या अंतराळ संशोधन संस्थांकडून प्रशिक्षण दिलं जाणार आहे. त्याबाबतचं वेळापत्रकही तयार आहे. २०२८ मध्ये नियोजनानुसार गगनयान मोहीम यशस्वी होईल, असा या क्षेत्रातल्या तमाम शास्त्रज्ञांचा दृढ विश्वास आहे. त्याला धोरणकर्त्यांनी बळ द्यायला हवं. विज्ञान तंत्रज्ञानातील संशोधनासाठी अमेरिका त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३.५% निधी खर्च करते, तर चीन २.७% निधी खर्च करतो. दक्षिण कोरियासारखा छोटा देश संशोधन, विकासावर त्यांच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ५ टक्के निधी खर्च करतो. ब्राझीलही त्यासाठी १.२% निधी राखीव ठेवतो. भारताचा हा खर्च आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या अवघा ०.७% टक्के आहे. म्हणजे, भारताने आपल्या विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधनासाठी किमान एक टक्क्यांचं महत्त्वाकांक्षी(!) उद्दिष्ट ठेवायला हवं, असं म्हणावं लागेल. आपल्या अर्थव्यवस्थेचा विस्तार, शिक्षण प्रसार, विविध क्षेत्रांत देशाची सुरू असलेली घोडदौड पाहता या बाबीवरही अत्यंत गांभीर्याने विचार व्हायला हवा.

सध्या दिसत असलेली प्रगती शाश्वत असावी, असं वाटत असेल, तर संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाच्या स्वदेशी प्रगतीसाठी निधीची चांगली तरतूद होणं गरजेचं आहे. संशोधन आणि नवीनतम कल्पनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वीच एक लाख कोटी रुपयांचा निधी राखीव ठेवण्याची घोषणा केली आहे. त्या निधीचा योग्य आणि कार्यक्षम वापर झाला, तर भारताची तरुणाई त्यात आपलं भरीव योगदान देईल यात शंका नाही.

# गोंदियातील स्पा पार्लरमध्ये देह व्यापाराचा पर्दाफाश! MOSS पार्लर सील न केल्याने खदखद, आंदोलनाची चेतावणी

## गोंदिया शहरातील सर्व युनिसेक्स स्पा पार्लरची चौकशी करण्यात यावी – ॲड. योगेश अग्रवाल बापू यांची मागणी

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------






शहराच्या मध्यवर्ती जयस्तंभ चौकात असलेल्या MOSS युनिसेक्स स्पा पार्लर मध्ये सुरू असलेल्या कथित देह व्यापार प्रकरणावर पोलिसांनी काही दिवसांपूर्वी छापा टाकून गुन्हा नोंदवला होता. मात्र, एवढे गंभीर प्रकरण उघडकीस आल्यावरही अद्याप या स्पा पार्लरला सील करण्यात न आल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

अखिल भारतीय बापू युवा संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष ॲड. योगेश अग्रवाल बापू यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, " शहराच्या हृदयस्थानी, शासकीय कार्यालयांसमोरील परिसरात असा बिनधास्त अवैध धंदा चालू राहणे हे थेट कायदा आणि सुव्यवस्थेचे उल्लंघन आहे. संबंधित स्पा पार्लरला तात्काळ सील करणे अपेक्षित होते."

संघटनेने उपविभागीय अधिकारी व पोलीस उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गोंदिया शहरात असे अनेक युनिसेक्स स्पा पार्लर आहेत जे कोणत्याही प्रशासनाच्या देखरेखीशिवाय बिनधास्त सुरू आहेत आणि अशा ठिकाणी अनैतिक कृत्ये व देह व्यापार होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

"जर MOSS स्पा पार्लरला त्वरित सील न केल्यास व इतर सर्व युनिसेक्स स्पा पार्लरची सखोल चौकशी सुरू न झाल्यास, बापू युवा संघटनेच्या महिला समितीच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. त्यासाठी सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, " असे निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांनी देखील आपली चिंता व्यक्त करत सांगितले की, " अशा पार्लरच्या आड चालणाऱ्या गोरखधंद्यांमुळे सामाजिक वातावरण बिघडत असून युवापिढीवर त्याचा वाईट परिणाम होत आहे."

बापू युवा संघटनेच्या महिला समितीच्या अनुपमा पटले, मानसी विठालकर, पोर्णिमा धुर्वे, ऐश्वर्या बोंबर्डे, चित्रा मेंढे, राशिका पडोळे, सुरेखा चौहान, छाया हरिनखेडे तसेच शिवकुमार बैस, ब्रिजलाल पटले आणि इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता पाहावे लागेल की प्रशासन या गंभीर प्रकरणावर किती गांभीर्याने आणि तत्परतेने कार्यवाही करते, अन्यथा संतप्त जनतेचा उद्रेक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शोध व बचाव कार्य, आपत्ती व्यवस्थापनासाठी उपयोगी पडणारे साहित्यांचे वितरण

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------



आपत्ती प्रसंगी शोध व बचाव कार्य करण्यासाठी आवश्यक असलेले साहित्याचे वितरण जिल्हाधधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणचे अध्यक्ष राहुल कर्डिले यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधधिकारी कार्यालय नांदेड येथे १६ तहसिल कार्यालय, ८ उपवविभागीय अधिकारी कार्यालय, मनपा, नप, होमगार्ड व क्युआरटी यांना नुकतेच वितरीत करण्यात आले.

यावेळी निवासी उप जिल्हाधधिकारी किरण अंबेकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कुऱ्हे, जि.आ.व्य. सहायक गौरव तिवारी, आ.व्य. विभागाचे बारकुजी मोरे म.स. कोमल नागरगोजे, मनपाचे अग्नीशमन विभागाचे केरोजी दासरी, कांबळे, ना. तह. जेठे यांच्यासह सर्व संबंधीत अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व राज्य शासन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याकडुन प्राप्त झालेले शोध व बचाव कार्यासाठी आपत्ती व्यवस्थापनास उपयोगी असे साहित्य ववितरणांमध्ये तहसिल कार्यालय- माहुर, नांदेड, मुखेड, धर्माबाद, बिलोली, नायगाव, हदगाव व मनपा यांना रबरीबोट, बोटचे इंजिन वितरीत करण्यात आले. तर उपविभागीय अधिकारी कार्यालय देगलूर, किनवट, नांदेड यांना ड्रोन कॅमेरासह इतर साहित्य वितरीत करण्यात आले आहे. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, मनपा, नप, होमगार्ड व क्युआरटीसह सर्व तहसिल कार्यालयांना शोध व बचाव कार्याकरीता आपत्ती व्यवस्थापनासाठी फायर एक्स्टींगग्रेसर, फायरमन पीक ॲक्स, फर्स्टऐड किट, गम सेफ्टी बुट, हॅण्ड गोल्ज, लाईफ बॉय, लाईफ जॅकेट, सेफ्टी गॉगल्स, बासकेट स्ट्रेचर, फायर ग्लास स्ट्रेचर, टुल किट, सेफ्टी हेलमेट, थ्रो बॅग्स, नेव्हीगेशन लाईट, रेडीओ वॉकी, नायलॉन रोप, एलईडी टॉर्च, ॲंकर फॉर इनफ्लांटेबल रेस्क्यु बोट, ग्लॅवानाईज मेटल बकेट ऑर बेलर ट्वीन प्रॉनग ग्राफेल/कॅट हुक्स, चेन सॉ मशीन, ॲक्स/हॅस्चेट इ. साहित्य वितरीत करण्यात आले आहे.

नांदेड जिल्हयाचा आपत्तीबाबतचा दरवर्षीचा अंदाज व पुर्व इतिहास पाहता साधरणतः ऑगस्ट महिन्याच्या अखेरीस व सप्टेंबर महिन्यात मान्सुनच्या पावसाचे प्रमाण वाढते, अतिवृष्टी होत असते. जिल्हयातुन वाहणाऱ्या गोदावरी, पैनगंगा, आसना, मन्याड, लेंडी, कयाधु, मांजरा इ. नद्यांच्या पात्रातील व जिल्हयातील धरणाच्या पाणीसाठ्यात वाढ होत असते. त्यामुळे मागील दोन-तीन वर्षापासून या कालावधीत जिल्हयात पुरसदृश्य परिस्थिती निर्माण होत असते. अशावेळी नांदेड शहरासह सर्व जिल्हाभरात विशेषतः नांदेड शहर व ग्रामीणसह, किनवट, माहुर, हदगाव, हिमायतनगर, मुदखेड, उमरी, मुखेड, देगलूर, बिलोली, कंधार इ. ठीकाणी पुरात अडकलेल्या शेतकरी, नागरीकांचे व पाळीव पशुंचे शोध व बचाव कार्य करावे लागल्याचा अनुभव आहे. त्यामुळे पुर्व तयारीचा भाग, दक्षता व शोध व बचाव कार्य करणाऱ्या यंत्रणांना सज्ज करण्यासाठी या शोध व बचाव कार्य, आपत्ती व्यवस्थापनाकरीता उपयोगी पडणारे साहित्यांचे वितरण करण्यात आले आहे.

# "हरितकुंभ अभियानातून निफाड महाविद्यालयात ५१ वृक्षांची हिरवी शपथ"

## "माझा कुंभ माझी जबाबदारी, माझा वृक्ष माझी जबाबदारी" या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनासाठी विद्यार्थी व शिक्षकांचा सशक्त सहभाग

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------------



सिंहस्थ कुंभमेळा हरितकुंभ संकल्पने अंतर्गत वृक्षारोपण करताना डॉ. उत्तमराव डेरले, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, समवेत वनपरिक्षेत्र अधिकारी नवनाथ गांगोडे, वनरक्षक अधिकारी श्रीमती कल्पना पाईकराव, उपप्राचार्य डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. सुसान लॉरेन्सिया, प्रा. अभय वडघुले, डॉ. महेश बनकर, प्रा. भाऊसाहेब मुंतोडे, प्रा. योगेश गीते, प्रा. प्रकाश आहेर, चेतन कुंदे, कार्यालयीन अधीक्षक संजय गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय निफाड येथे जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक, निफाड वनविभाग कार्यालय, राष्ट्रीय सेवा योजना या सर्वांच्या संयुक्त विद्यमाने " हरित कुंभ २०२५ ते २०२७ " या अंतर्गत बुधवार दि. १६ जुलै रोजी सामूहिक वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी शालेय विकास समितीचे अध्यक्ष डॉ. उत्तमराव डेरले आणि प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांच्या शुभहस्ते ५१ वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने शिशु, अर्जुन सादडा, कॅज्युअल पिनाटा, सिताफळ, आंबट चिंच, कडुनिंब, जांभूळ, नारळ, आंबा, सीताफळ, चिकू, या रोपांची प्रामुख्याने लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाच्या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी नवनाथ गांगोडे, वनरक्षक अधिकारी श्रीमती कल्पना पाईकराव, उपप्राचार्य डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. सुसान लॉरेन्सिया, प्रा. अभय वडघुले, डॉ. महेश बनकर, प्रा. भाऊसाहेब मुंतोडे, प्रा. योगेश गीते, प्रा. प्रकाश आहेर, चेतन कुंदे, कार्यालयीन अधीक्षक संजय गायकवाड व राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी माहिती दिली की, निफाड महाविद्यालयात यावर्षी १०, ०००/- संख्येची रोपवाटिका तयार करण्यात आली असून त्यातून प्रत्येक विद्यार्थ्याला एक रोप दिले असून सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या घरी व परिसरात वृक्षारोपण केले आहे, तसेच महाविद्यालयात माझा वाढदिवस माझे झाड, आणि विठ्ठलाचे झाड या संकल्पनेतून महाविद्यालय परिसरात सर्व प्राध्यापक प्राध्यापिका व शिक्षकेतर सेवक आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी असे एकूण ५३२ रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे.

याचा फायदा पर्यावरण पूरक व हरित वातावरण निर्माण करण्यासाठी होणार असून, विद्यार्थ्यांमध्ये वृक्ष संवर्धनासाठी याद्वारे जनजागृतीचे मोठे काम होणार आहे, वृक्ष संवर्धन चळवळीत सर्वांनी सहभागी होऊन पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी आपले योगदान द्यावे असे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वीततेसाठी सर्व प्राध्यापक प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सोनोपंत दांडेकर महाविद्यालयात अळंबी उत्पादन प्रशिक्षण शिबिर

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------

अळंबी हे एक कोलेस्टेरॉल विरहित, प्रथिनयुक्त, रोगप्रतिकारकशक्ती देणारे, उपचारात्मक आहारात वैद्यकीयदृष्ट्या मान्यताप्राप्त अन्न आहे. अळंबीचे विविध खाद्यपदार्थ व डेलिकसी म्हणून जगभरात लोकप्रिय आहेत. भाताच्या पेंढ्यावर धिंगरी अळंबी उत्पादन हा कमी गुंतवणुकीत, कमी जागेत, वर्षभर करता येण्याजोगा किफायतशीर व्यावसाय आहे. सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर मधील हॉर्टिकल्चर विभागामार्फत थोड्या अळंबी उत्पादनाचे प्रात्यक्षिकावर आधारित एक दिवसाचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येत आहे. अळंबी शेतीची संकल्पना, मूलतत्त्वे, उत्पादन पद्धती व व्यवसाय उभारणी या विषयीचे शास्त्रीय प्रशिक्षण, शंकासमाधानासह अतिशय सोप्या भाषेत, प्रात्यशिकांद्वारे दिले जाणार आहे. इच्छुक उमेदवारांनी सदर प्रशिक्षणाचा बहुसंख्येने लाभ घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे यांनी केले आहे.

**प्रशिक्षण दिनांक:** शनिवार, २३ ऑगस्ट २०२५

**प्रशिक्षण विशेषज्ञ :** प्रा. प्रसाद कासले (प्रभारी प्राचार्य, कृषीतंत्र विद्यालय, कोसबाड, ता. डहाणू)

**संपर्क:** प्रा. आनंद जाधव – ९४२०५७००४७ व प्रा. प्रवीणा कोचरेकर – ९२२६२७९८०४

# नांदेड येथे मराठी पत्रकार संघाची डिजिटल कार्यकारिणी जाहीर सय्यद समी यांची तालुकाध्यक्षपदी निवड

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------------



नांदेड येथे मराठी पत्रकार संघाची डिजिटल कार्यकारणी मराठी पत्रकार संघाचे देगलूर तालुकाध्यक्ष श्याम वद्देवार यांच्या नेतृत्वाखाली नांदेड जिल्हाध्यक्ष संतोष पंडागळे साहेबांच्या व डिजिटल विंग जिल्हा सय्यद मुजीब यांच्या हस्ते सय्यद समी यांची तालुकाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. व सर्व कार्यकारी पुढिल प्रमाणे तालुका उपाध्यक्ष:- नाझिम शाह, सचिव:- इसाक पटेल, कार्याध्यक्ष:- डॉ सुनिल जाधव, संघटक:- संतोष मनधरने, सहसचिव:- हमिद कुरेशी, सहकार्याध्यक्ष :- सय्यद मसतान, सह संघटक:- एकनाथ गायकवाड, यावेळी पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शेख असलम, सचिव तथा जेष्ठ संपादक गजानन टेकाळे, कार्याध्यक्ष धनाजी देशमुख आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# न्यू इंग्लिश स्कूल मध्ये शिक्षक पालक संवाद मेळावा उत्साहात संपन्न

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------











मविप्र संचलित न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव या विद्यालयात सन २०२५/२६ या शैक्षणिक वर्षाचा शिक्षक पालक संवाद मिळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी शालेय समिती अध्यक्ष श्री विजय काकळीज होते. व्यासपीठावर विद्यालयाचा मुख्याध्यापिका ज्योती काळे ,पर्यवेक्षक अविनाश शेवाळे , बैरागी सर, अक्षदा कुलकर्णी, जयश्री बोराडे इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने करण्यात आली . या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे पर्यवेक्षक अविनाश शेवाळे यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकात शिक्षक पालक संवाद मेळाव्याचा उद्देश पालकांसमोर मांडला.यानंतर दीपप्रज्वलन व सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांचा हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांचा , पालक व माता पालक प्रतिनिधींचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक अशोक मार्कंड यांनी सन २०२४/२५ या शैक्षणिक वर्षाचा प्रगतीचा लेखाजोखा पालकांसमोर मांडला. विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख कसा उंचावत आहे हे त्यांनी पालकांना पटवून दिले. पालक मनोगतात भारत वाघमारे ,सचिन पवार, अक्षदा कुलकर्णी यांनी आपले विद्यालय प्रती मनोगत व्यक्त केले. विद्यालयाचा मुख्याध्यापिका ज्योती काळे यांनी आपल्या मनोगतात शिक्षणाचा रथ सुरळीत चालण्यासाठी व मुलांचा सर्वांगीण विकास होण्याकरिता पालक व शिक्षक यांच्यात सुसंवाद , सहकार्य आणि विश्वासाचे नातं निर्माण होणं किती महत्त्वाचं आहे हे सांगितले. यानंतर विद्यालयाचे उपशिक्षक राजेंद्र कदम व उपशिक्षिका सुनिता निकम यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक पालक संघ व माता पालक संघाची स्थापना करण्यात आली. मविप्र संस्थेचे तालुका संचालक आदरणीय अमित भाऊ पाटील यांनी शिक्षक पालक संघ व माता पालक संघाचा सर्व सदस्यांचे अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

अध्यक्षीय मनोगतात श्री विजय काकळीज यांनी शिक्षण ही शाळेची तर जबाबदारी आहेच परंतु पालकांची देखील जबाबदारी आहे. पालक देखील विद्यार्थ्यांचा प्रगतीचा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षक, पालक, आणि विद्यार्थी तीन विद्यार्थी प्रगतीचे स्तंभ आहेत हे त्यांनी सांगितले. स्वागतगीत व ईशस्तवन विद्यालयाच्या संगीत शिक्षिका कल्पना अहिरे व गीतमंच यांनी सादर केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद आहेर तर आभार प्रदर्शन बाळासाहेब कवडे यांनी केले.

# नाशिक मधील नामानिक्त अंबिका मित्र मंडळ या संस्थेचे सचिव श्री. अमोल बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------





अंबिका मित्र मंडळाचे दूरदृष्टी संपन्न, समाजकार्याशी बांधिलकी असलेले आणि विद्यार्थ्यांवर निस्सीम प्रेम करणारे सचिव श्री. अमोल बाळासाहेब पाटील यांचा वाढदिवस विद्यालयात अत्यंत उत्साहात आणि सेवाभावाने साजरा करण्यात आला.

या विशेष दिवशी विद्यार्थ्यांनी रंगीत पारंपरिक वेशात नृत्याच्या माध्यमातून सचिवांचे स्वागत केले. शाळेच्या प्रांगणात आनंदाचा वर्षाव होत होता. त्यांच्या आगमनाने वातावरण प्रसन्न झाले आणि सर्वत्र प्रेरणेचा संचार झाला. कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. बाळासाहेब विनायक पाटील, रवी पाटील, राम पाटील, जितू पाटील, योगेश गांगुर्डे, आशिष हिरे, भूषण राणे, प्रशासन अधिकारी आर.सी. सोनवणे, मुख्याध्यापिका श्रीमती विद्या पाटील (प्राथमिक) व श्रीमती कविता देवकर (माध्यमिक) यांच्यासह शिक्षकवृंद, पालक, विद्यार्थी आणि परिसरातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. अमोल पाटील हे केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर समाजकारण, ग्रामीण विकास, वंचित घटकांसाठी कार्य, वृद्धजनांची सेवा, आणि वडीलधाऱ्या मंडळींचा सन्मान यासाठीही सातत्याने झटणारे व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी अनेक गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणात हातभार लावला आहे, तर समाजातील वृद्ध, अंध, विधवा, दिव्यांगांसाठी वैद्यकीय मदत, वस्त्रवाटप, औषधसेवा अशा उपक्रमांत स्वतः सक्रिय सहभाग घेतलेला आहे. राजकारणात सौम्य पण स्पष्ट भूमिका घेत, त्यांनी 'लोकसेवेचा मार्ग हा शाळेपासून सुरू होतो' या तत्त्वाचा नेहमी पुरस्कार केला आहे. त्यांच्या कार्यात अहंभाव नाही, प्रतिष्ठा नाही, तर आहे केवळ शुद्ध सेवाभाव. म्हणूनच विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिक त्यांच्याकडे आदराने, विश्वासाने आणि प्रेमाने पाहतात.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गीत, भाषण, नृत्याद्वारे सचिवांविषयी आपले प्रेम व्यक्त केले. विविध शिक्षकांनीही आपले अनुभव सांगताना सचिवांच्या नेतृत्व, निर्णयक्षमतेची आणि सर्वसामान्यांप्रती असलेल्या सहृदयतेची मनापासून प्रशंसा केली.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. अमोल पाटील यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले आणि सांगितले की, "शाळा म्हणजे केवळ शिक्षणाचं मंदिर नसून ती संस्कारांची शाळा आहे. इथूनच समाज घडतो. विद्यार्थ्यांचे जीवन उजळवणे हेच माझं खरे कर्तव्य आहे."

# भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL), नाशिक- स्वच्छता अभियान पंधरवडा उपक्रम

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------







भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड नासिक 'स्वच्छता अभियान पंधरवडा 'या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना शालेय परिसर स्वच्छतेचे, वैयक्तिक स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात आले तसेच आरोग्य विषयक जनजागृती विद्यार्थ्यांमध्ये करून देण्यात आली. त्याचप्रमाणे घरगुती गॅस वापराबाबत आपण कशाप्रकारे काळजी घ्यावी याबाबत बीपीसीएलचे मॅनेजर माननीय श्री राजकुमार यादव यांनी सांगितले .

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मा. बाळासाहेब पाटील, संस्थेचे सचिव मा. अमोल दादा पाटील , प्रशासन अधिकारी मा. सोनवणे साहेब, मुख्याध्यापिका कविता देवकर, बीपीसीएल चे मॅनेजर मा.राजकुमार यादव साहेब, बीपीसीएलचे कर्मचारी उज्वल पगारे व सहकारी उपस्थित होते. याप्रसंगी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड नासिक यांच्यातर्फे आमच्या विद्यालयातील शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात नाव कमावलेल्या विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी साहित्य वाटप करण्यात आले. तसेच आरोग्य जपणाऱ्या साबण, टूथपेस्ट,ब्रश यासारख्या अनेक वस्तूंचे वाटप करण्यात आले. त्यांच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक सर्व पालक वर्ग करत आहेत. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मा. मोरे सरांनी केले व मा. देसले सर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, आमगाव येथे Student Police Cadet Programme संपन्न

## विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्यांची पेरणी व जबाबदारी नागरिक घडवण्याचे उद्दिष्ट

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------




महाराष्ट्र शासनाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या Student Police Cadet Programme (SPC) अंतर्गत जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, आमगाव येथे दिनांक १६ जुलै २०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचा उद्देश शालेय स्तरावर विद्यार्थ्यांमध्ये नीतिमूल्यांची रुजवण, सामाजिक जाणिवा, कायद्याचे पालन आणि जबाबदारी नागरिक घडविणे हा आहे. विशेषतः ८ वी व ९ वी वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये ही बालविवाह, स्वच्छता, आपत्ती व्यवस्थापन, यांसारख्या अनेक महत्वाच्या विषयांचा समावेश आहे.

या कार्यक्रमासाठी मा. पोलीस अधीक्षक गोंदिया श्री. गोरख भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार लिओनार्ड पो.उपनिरीक्षक ऑफरीन शेख, सपना सिडाम, जयश्री गवाने, सफौ राजेश शेंद्रे व म.पो.ह.वा. तनुजा मेश्राम यांनी मार्गदर्शन करताना पोलीस विभागाचे कार्य, त्यांचा इतिहास, समाजातील जबाबदारी, विद्यार्थ्यांनी कायद्याचे पालन का करावे, याबाबत सखोल माहिती दिली.

कार्यक्रमास शाळेच्या अति. कार्यवाह प्राचार्या श्रीमती कुथीरकर मॅडम, शिक्षिका ए. बी. यादव मॅडम, जे. आर. शुक्ला आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. ए. बी. यादव मॅडम यांनी तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पोलीस निरीक्षक श्रीमती नंदिनी चानपुरकर, पो.ह.वा. लिओनार्ड मार्टिन, नरेश गायधने, राज वैद्य, सत्यशिला छिपे व पो.का. शुभम शेंडे यांनी मोलाचे सहकार्य केले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरला असून, विद्यार्थ्यांनी याला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# धुळ्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची मोठी कारवाई: ५,००० रुपयांची लाच घेताना सरकारी अधिकारी गजाआड

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, धुळे येथील जिल्हा समन्वयक शुभम भिका देव (वय २८) याला लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) धुळे यांनी १६ जुलै रोजी ५,००० रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले.

तक्रारदाराने जेसीबी घेण्यासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जावर सरकारच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभासाठी अर्ज महामंडळाच्या मुंबई कार्यालयात पाठवण्याचे काम होते. मात्र, हे काम करण्यासाठी शुभम देव याने तक्रारदाराकडे ५,००० रुपयांची लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराने ही बाब तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे यांच्याकडे कळवली. खात्री करण्यासाठी ACB विभागाने यासंदर्भात सविस्तर पडताळणी केली असता तक्रार खरी असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर १६ जुलै रोजी सापळा रचून शुभम देव याला लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारित २०१८) अंतर्गत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया धुळे शहर पोलीस ठाण्यात सुरू आहे. त्याचवेळी आरोपीच्या घराची झडती घेण्यात आली असून, दोन मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.या कारवाईत सहभागी असलेले अधिकारी: श्री. सचिन साळुंखे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे श्रीमती पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे

राजन कदम, मुकेश अहिरे, प्रशांत बागुल, मकरंद पाटील, जगदीश बडगुजर – ACB पथकाचे सदस्य

नागरिकांसाठी A C B चे आवाहन: कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी लाचेची मागणी करत असल्यास, नागरिकांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे तात्काळ संपर्क साधावा. संपर्क क्रमांक: ०२५६२-२३४०२०

# देगलूरमध्ये प्रशासनाचा अधिकृत डिजिटल ग्रुप तयार करण्याची निवेदनाद्वारे मागणी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------



प्रशासनाची अधिकृत माहिती, योजनांचे अपडेट्स आणि घडामोडी वेळेवर जनतेपर्यंत पोहोचाव्यात यासाठी देगलूर तालुक्यात स्वतंत्र सोशल मीडिया ग्रुप तयार करण्यात यावा, अशी ठाम मागणी व्हाईस ऑफ मीडिया शाखा देगलूरच्या वतीने करण्यात आली. यास उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद देत लवकरच डिजिटल ग्रुप सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

दि. १७ जुलै रोजी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांना दिलेल्या लेखी निवेदनात, सध्या नांदेड जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने फेसबुकवर 'जिल्हा माहिती कार्यालय' या नावाने चालविल्या जाणाऱ्या ग्रुपच्या धर्तीवर देगलूरमध्येही असा प्लॅटफॉर्म सुरू व्हावा, अशी मागणी मांडण्यात आली.

सदर ग्रुपद्वारे जिल्हास्तरावरील अधिकृत निर्णय, कार्यक्रमांचे फोटो, योजनांची माहिती, अधिकाऱ्यांचे दौरे यासारख्या बाबी वेळोवेळी प्रसिद्ध केल्या जातात. त्यामुळे पत्रकारांना अचूक व अधिकृत माहिती मिळते. मात्र देगलूरसारख्या तालुक्यात अद्याप अशी व्यवस्था नसल्यामुळे अनेकदा महत्त्वाची माहिती पत्रकारांपर्यंत वेळेवर पोहोचत नाही.

अधिकारी कामाच्या व्यापात असल्यामुळे थेट संपर्क शक्य होत नाही आणि माहिती मिळवणे कठीण जाते. परिणामी प्रशासनाचे उपक्रम, योजना आणि निर्णय जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाहीत. त्यामुळे प्रशासन आणि पत्रकार यांच्यातील दुवा म्हणून असा अधिकृत सोशल मीडिया ग्रुप आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

या वेळी व्हाईस ऑफ मीडियाचे तालुकाध्यक्ष प्रा. निवृत्ती भागवत, सचिव शब्बीर शेख, उपाध्यक्ष सतीश पांडवे, प्रसिद्धी प्रमुख शिवकुमार बिरादार, सदस्य दिगंबर जाधव आणि सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांची उपस्थिती होती.

"जनतेपर्यंत प्रशासनाचे कामकाज पोहोचवण्यासाठी लवकरच तालुकास्तरावर अधिकृत ग्रुप सुरू केला जाईल,"

असा विश्वास उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांनी यावेळी दिला.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र संघटनेचा दहावा वर्धापन दिन साजरा

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------------



माहुर येथे कपिलेश्वर धर्मशाळा येथे दि.१५ जुलै रोजी दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र संघटनेचा दहावा वर्धापन दिन, संस्थापक अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटिल,व दोन दिव्यांचा बांधव रेवा राठोड, प्रदिप शेरकुरवार यांचा जन्मदिन अभिष्टचिंतन सोहळा व दिव्यांग वृध्द निराधाराचा भव्य मेळावा माहुर तालुक्यातील पदाधिकारी यांनी उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

प्रथम आलेल्या सर्व मान्यवरांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला
व दिव्यांग वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटिल,रेवा राठोड या तिघाचा एकाचवेळी शेकडो दिव्यांग, वृध्द, निराधाराच्या ऊपस्थित केक कापुन उत्साहात टाळयांच्या गजरात जन्मदिनी केक भरून कार्यकर्त्यांनी आर्शिवादरूपी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र वायरल न्यूज चे मुख्य संपादक तथा सामाजिक कार्यकर्ते बबलू भालेराव हे होते.

कार्यक्रमाचे मार्गदर्शक वक्ते दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटिल, प्रमुख पाहुणे जिल्हा उपअध्यक्ष राजु भाऊ शेरकुरवार, किनवट ता.अध्यक्ष अंकुश राठोड, ता.सचिव शेख बशिर,हे होते.

प्रास्ताविक जिल्हाऊपअध्यक्ष राजु भाऊ शेरकुरवार यांनीदिव्यांचा,वृध्द निराधार मित्र मंडळ महाराष्ट्र हि संघटना दहा वर्षापासुन अम्हिच डाकोरे साहेबांच्या विचारा बरोबर संघर्ष केल्यामुळे आज दिव्यांगाना न्मय हक्क मिळत आहे आहे.डाकोरे साहेब दोन्ही पायाने दिव्यांग असुन ते नेहमी दिव्यांग,वृध्द, निराधारांच्या प्रश्नांसाठी सतत संघर्षामुळे न्याय हक्क मिळत असल्याने आपण सर्वांनी डाकोरेच्या संघर्षात सहभागी व्हावे असे आव्हान केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संघटनेचे माजी ता.अध्यक्ष प्रेमसिंग चव्हाण यांनी केले

संस्थापक अध्यक्ष चंपतराव डाकोरे पाटिल कुंचोलीकर यांनी गत दहा वर्षांपासून आपण सर्वांनी संघटितपणे संघर्षासाठि एकत्रित सहभागी झाल्यामुळे व संघटनेच्या दोनशे सत्तर सदशिर आंदोलनामुळे आपणास हक्क मिळत आहे.आतापर्यंत आपले आंदोलन प्रशासन ऑफिस वर केल्यामुळे अनेक प्रश्नांला न्याय मिळाला

यापुढे कुंभकर्ण लोकप्रतिनिधीला जागे करण्यासाठी खासदार, आमदार यांना जागे करण्यासाठी अनेक प्रकारचे आंदोलन करण्यास दि.१५: जुलै २०२५ते ३१ मार्च २०२६पर्यंत आमदार, खासदार यांच्या निवासस्थानी अर्ध नग्न अवस्थेत भिक मागो अनेक प्रकारचे आंदोलनाला सुरुवात माजी मुख्यमंत्री सध्याचे खासदार अशोकराव चव्हाण, आमदार श्री ज्या चव्हाण, आमदार राजेश पवार, आमदार हेमंत पाटिल, आमदार बालाजी कल्याणकर यांच्या निवासस्थानी आंदोलन केल्यामुळे अनेक आमदार, खासदार दिव्यांगाचा निधी वाटप करण्याचे आश्वासन दिले व खासदार रविंद्र चव्हाण यांनी दिव्यांग निधी पुढच्या महिन्यात दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्या पुतळा अनावरण प्रसंगी वाटप करण्याचे आश्वासन दिले.

दिव्यांगानि गनिमी काव्याने चालु असलेल्या अधिवेशनात प्रवेश करण्यासाठी दि.९ जुलै रोजी मुंबई अधिवेशनात प्रवेश करण्याचा प्रयत्न केल्यानंतर पोलिसांच्या शक्तीपुढे दिव्यांचा घ्या वाहनासहित आझाद मैदानावर अटक करून पोलिस प्रशासनाने दिव्यांग शिष्टमंडळाची दिव्यांगकॅबिनेट दिव्यांग मंत्रालय अध्यक्ष मा अतुल सावे यांच्यासोबत चर्चेत दिव्यांगाचा आमदार निधी शंभर टक्के वाटप करण्याचे व मुख्यमंत्री साहेबासोत संघटनेची बैठक घेण्याचे आश्वासन दिले.
शिवसेना शिंदे गटाचे केंद्रीय मंत्री मां.ऊदय सामंत यांनी आझाद मैदानावर दिव्यांगाच्या आंदोलनात भेट घेऊन सर्व प्रश्न सोडविण्यासाचे अश्वासन दिले
तसेच आपल्या किनवटच्या आमदारांना जागे करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी आंदोलन करायचे काय? असे विचारताच एका आवाजात करायचे सर्वांच्या मते निर्णय घेण्यात आला त्यांचा दिनांक कळविण्यात येईल
आणि दिव्यांगाना मिळणारा निधी ग्रामपंचायत, नगरपंचायत , नगरपालिका, महानगरपालिका पंचायत समिती, जिल्हा परिषद , आमदार,खासदार, निधी प्रत्येक ठिकाणाहून दिव्यांग बांधवांना त्यांच्या हक्काचा निधीसाठी मिळतो ते आपण सर्वजन स़घटितपणे संघर्ष केल्याशिवाय मिळत नाहि आपण सर्वांनी संघटित पणे शासन प्रशासन जागे करण्यासाठी आतापर्यंत दहा वर्षांत अनेक प्रकारचे सनदशीर मार्गाने आंदोलन केल्यामुळे आपणास हक्क मिळत आहे. सर्वांनी संघटित होण्यासाठी आव्हान केले

कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक क्षेत्रात काम करणारे यु टुब संपादक मा.बबलु भालेराव ऊदिव्यांग चळवळ वाढविल्या शिवाय संघटितपणे संघर्षासाठि एकत्रित शक्ति निर्माण केल्याशिवाय आपल्या उपेक्षित समाजाला काहि मिळत नाहि मी नेहमी आपल्या संघटनेची चळवळ डाकोरे साहेबांचे कार्य ऑनलाईन पाहात असतो त्यांची भेट आज मी फोन करुन त्यांना शुभेच्छा देण्यासाठी व चळवळीची
माहिती पावसाचे दिवस असताना आपण दिव्यांग असुन मोठ्या संख्येने डाकोरे साहेबाना शुभेच्छा देण्यासाठी आलात मी सर्व पाहुन तुमच्या एकजुटिला सलाम करतो तुमच्या कार्याला शुभेच्छा व आपल्या कार्यासाठी तुमच्या सोबत आहे.
या.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी या.अध्यक्ष उमेश भगत राजूभाऊ,प्रेमसिंग चव्हाण, दादाराव कांबळे,
हेमसिंग आडे ,रेवा राठोड ,राजेश सुकळकर , अमोल सोनवणे, विष्णू गायकवाड, वनिताबाई पेटकुले, इंदुताई चपटेकर ,चित्रा इंगोले, आशाताई पिसाळ पुष्पा कलाने, सुमनबाई हगवणे, भिमराव आत्राम, आनंदराव आत्राम माहूर किनवट तालुक्यातील शाखा प्रमुख सहित शेकडो कार्यकर्ते सहभागी होते.
हा कार्यक्रम माहुर तालुक्यातील पदाधिकारी यांनी नाष्टा चहा पाण्याची,सर्वांचा सत्कार करून उत्साहात संपन्न झाला असे प्रसिध्दी पत्रक माहुर ता.अध्यक्ष उमेश भगत यांनी दिले

# वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता ; हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------------

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी दि. १६ जुलै २०२५ रोजी दुपारी १२:०३ वाजता दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि. १७, १८ व १९ जुलै २०२५ या तीन दिवसांसाठी यलो (Yellow) अलर्ट जारी केलेला आहे. ह्या तीन दिवसांच्या कालावधीत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**या गोष्टी करा**

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. तुमच्या स्मार्ट मोबाईल फोन मध्ये 'दामिनी', 'सचेत' हे दोन ॲप डाउनलोड करा 'दामिनी' ॲप तुमच्या आजूबाजूला वीज विषयक संभाव्य धोके दर्शविते तर 'सचेत' ॲप मुळे तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या हवामानाविषयी अचूक इशारे व माहिती मिळते.

**या गोष्टी करु नका**

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.


अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७


# नांदगाव तालुक्यातील नाग्यासाक्या मध्यम प्रकल्पाचे कालव्याचे दुरुस्ती चे काम मार्गी लागणार

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



नांदगाव तालुक्यातील नाग्यासाक्या मध्यम प्रकल्पावरील छतीग्रस्त उजवा व डावा कालवा कामासंदर्भात महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री सन्माननीय श्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्यासोबत नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे आ.सुहास कांदे यांची बैठक मुंबई येथे पार पडली.सदर बैठकीतून सन्माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक दाखवली असून लवकरच या कामांना सुरुवात होणार आहे.
सद्यस्थितीत सदर प्रकल्पाचे दोन्ही मुख्य कार्यवाहीतील बांधकामे माती भराव क्षतिग्रस्त झाले असून आवर्तन काळात कालव्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होते. परिणामी धरणात सिंचनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असून देखील त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत नाही या अनुषंगाने या कालव्यांचे भराव, दुरुस्ती व बांधकाम, मजबुतीकरण अस्तरीकरण, झाल्यास परिसरातील शेतकरी बांधवांना मोठा दिलासा मिळणार आहे. यावर मंत्री महोदयांनी सकारात्मकता दाखवली असून लवकरच हा प्रश्न मार्गी लागणार आहे. सोबतच गिरणा डावा उजवा वाढवी कालव्याची बंदिस्त पाईपलाईन व मांजरे ते नगाव पाटाचे खोलीकरण दुरुस्ती करून अस्तरीकरण करण्याचा प्रश्नही मार्गी लागला आहे, सदर प्रस्ताव मालेगाव नाशिक कार्यालयानंतर आता संभाजीनगर कार्यालयात असून आठ दिवसात तो मागवण्याची आदेश मंत्री महोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिलेला आहे. या बैठकीत सन्माननीय मंत्री महोदय तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद सदस्य जगदिश (बालु ) बावनथडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सायकल वाटप

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिला प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



तिरोडा तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय सुकळी डाकराम येथे शाळेतील विद्यार्थिनींना मानव विकास कार्यक्रम अंतर्गत सायकलचे वाटप जिल्हा परिषद सदस्य जगदीश (बालु) बावनथळे व शाळा समिती अध्यक्ष यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने उपस्थित सुनील मेश्राम सरपंच सुकळी , संदीप कुर्वे उपसरपंच सुकळी, मुख्याध्यापक पोहळकर व शाळेतील शिक्षक शिक्षिका व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना सायकली मिळाल्यामुळे त्यांना खूप आनंद झाला असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या सायकल वाटप झाल्यामुळे विद्यार्थ्यांना येण्या जाण्यासाठी खूप सोयीचे झाले असून सर्व विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद सदस्य जगदीश बावनथळे यांच्या मनापासून आभार व्यक्त केला आहे.

# जिल्हा परिषद शाळा दिघावे विशेष मोहीम राबवली स्वच्छ भारत मिशन

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



साक्री तालुक्यातील दिघावे ग्रामपंचायत अंतर्गत मध्ये उघड्यावर दिसणारा प्लास्टिक कचरा संकलन मोहीम घेण्यात आली . त्याचप्रमाणे ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील कार्यालय शाळा अंगणवाडी आरोग्य केंद्र उपकेंद्र ग्रामपंचायत कार्यालय परिसरामध्ये उघड्यावर दिसणारा जो प्लास्टिक कचरा गोळा करून त्यांची सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची मोहीम दिनांक १७/७/२०२५ . रोजी राबविण्यात आली तसेच जिल्हा परिषद शाळेतील मुल मुली व शिक्षक यांचं कौतुक देखील करण्यात आलं. या मोहिमेचे काही मुख्य उद्देश होते प्लास्टिक कचरा व्यवस्थापन जागृत वाढवण्या बाबत विद्यार्थ्यांना पर्यावरणाबद्दल जबाबदार बनवणे कचरा कमी करणे आणि पुनर्वापर ( recycling) करण्यात प्रोत्साहन देणे, स्वच्छ आणि सुंदर परिसर निर्माण करणे. या मोहीमे मुळे शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यात एकजूट आणि सामाजिक जबाबदारीची भावना वाढीस लागली . या मोहिमेमुळे शाळेतील विद्यार्थ्यांना प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापनाचे महत्त्व तर समजेलच , शिवाय पर्यावरणाबद्दलची त्यांची जागरूकता देखील वाढली. शाळेच्या मुख्याध्यापकांनी या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे आभार मानले . आणि भविष्यातही अशाच प्रकारे पर्यावरण पूरक उपक्रम शाळेत राबविण्यात येतील, असे आश्वासन दिले . मोहिमे दरम्यान विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा गोळा केला , ज्यामध्ये प्लास्टिकच्या पिशव्या पाण्याच्या बाटल्या खाद्यपदार्थांचे वेष्टण ( wrapperes) आणि इतर प्लास्टिक वस्तूंचा समावेश होता .गोळा केलेला कचरा शाळेच्या जवळच असलेला कचरा व्यवस्थापन केंद्रात जमा करण्यात आला .

# साक्रीत ब्राह्मण समाजाचा वार्षिक स्नेह मेळावा; विद्यार्थ्यांचा गुण गौरव ही पार पडला

विनोद मोरे
साक्री शहर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



सालाबाद प्रमाणे याही वर्षी साक्री तालुका ब्राह्मण बहु उद्देशीय संस्थेच्या वतीने वार्षिक स्नेह मेळावा व विद्यार्थी गुणगौरव सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनील जोशी हे होते .तर प्रमुख अतिथी म्हणून धुळ्याचे ए.सी.पी.एम. मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. रोहन कुलकर्णी ,माधव बाग धुळेचे डॉ. देवयानी देशपांडे ,कपिलेश्वर महादेव मंदिर मुडावादचे आचार्य हंसदानंद तीर्थजी महाराज , शेखर कुलकर्णी तसेच गणू महाराज उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करून उद्घाटन करण्यात आले .
प्रमुख पाहुणे डॉक्टर रोहन कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना सांगितले की ब्राह्मण समाजाने आरोग्याच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, वैयक्तिक आरोग्याकडे लक्ष द्यावे. तर डॉ.देवयानी देशपांडे यांनी आपल्या शरीरावर प्रेम करावे आयुर्वेदिक औषधींना प्राधान्य द्यावे तसेच योगा व प्राणायाम निमित्त सुरू ठेवावे असे म्हटले.
शेखर कुलकर्णी यांनी अमृत योजनेविषयी माहिती देताना ब्राह्मण समाजाने या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. अध्यक्षीय भाषणातून सुनील जोशी यांनी साक्रीतील सर्व ब्राह्मण समाजाने एकजुटीने राहावे असे सांगून समाजातील लोकांनी केलेल्या सहकार्य बद्दल ऋण व्यक्त केले .
या कार्यक्रमात साक्री तालुका ब्राह्मण बहुउद्देशीय संस्थेचे माजी अध्यक्ष किशोर कुलकर्णी यांनी जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले . तसेच विविध शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही गुणगौरव करण्यात आला . यावेळी समाजातून विशेष प्रावीण्य मिळवलेल्या ब्राह्मण सदस्यांचा सन्मान करण्यात आला
या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमाकांत देशपांडे व डॉ.निलेश माळीच कर यांनी केले . तर संजय दीक्षित यांनी आभार मानले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हेमंत भंडारी ,बापूराव पाठक अरुण जोशी, प्रसाद पंडित, संदीप भट ,हरीषपिसोळकर, शुभम गैंड, तेजस मिसर , प्रफुल्ल अग्निहोत्री , भुषण रोहडे , आशुतोषचंद्रात्रे , किशोर अग्निहोत्री ,मंदार कुलकर्णी, मनोज रावल ,निलेश कुलकर्णी, संदीप पाठक, कुणाल दीक्षित , प्रसाद देशपांडे व समस्त साक्री तालुका ब्राह्मण समाजाने परिश्रम घेतले .

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!






महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**

PASSWORD PROTECTED PAGE